# जाहिर निवेदन

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत मुंबई मधील सेंच्यूरी मिल, रुबी मिल, वेस्टर्न इंडिया मिल (एम.एस.टी.सी.), प्रकाश कॉटन मिल, भारत मिल (पोद्दार मिल) व ज्यूबिली मिल या ६ गिरणींच्या जागेवर सदनिकांचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे. सदर सदनिकांकरीता त्याच गिरण्यांमधील कामगारांमधून सोडत काढण्यात येणार असून सहाही गिरण्यांमधील गिरणी कामगार/ मयत गिरणी कामगारांची सारस्वत बँक व ॲक्सीस बँकेमार्फत प्राप्त माहिती म्हाडाचे संकेतस्थळ https://mhada.maharashtra.gov.in येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर यादीमध्ये दिलेल्या माहितीमध्ये चूक असल्यास अशा अर्जदारांनी आपल्या माहितीमध्ये योग्य ती दुरुस्ती करुन घेण्याबाबत दि.११ जून २०१४ ते ३१ जूलै २०१४ पर्यंत (शासकिय सुटया वगळून) संधी देण्यात येत आहे. या कालावधीमध्ये अर्जदारांनी विहीत नमुन्यासह आवश्यक असलेल्या बदलाबाबतचे योग्य पुरावे सादर करावे जेणेकरुन सोडतीमध्ये माहितीमध्ये दुरुस्ती करणे शक्य होईल. माहितीमधील दुरुस्तीबाबतचा अर्ज उपमुख्य अधिकारी (पणन)/ मुं.मं., कक्ष क्र.१९, तळमजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१. येथे प्रत्यक्ष हजर राहून अथवा टपालाने तसेच dycomkt_girnikamgar@mhada.org येथे ई-मेल व्दारे दि.३१/०७/२०१४ पर्यंत अथवा तत्पूर्वी पोहोचेल अशा पध्दतीने पाठविण्यात यावा. यानंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई.

अर्जदार :श्री. ______________________
पत्ता : __________________________
__________________________
__________________________

दि.    /    /२०१४.

प्रति,
**मा. उपमुख्य अधिकारी (पणन),**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
कक्ष क्र.१९, तळ मजला, गृहनिर्माण भवन,
कलानगर, वांद्रे(पूर्व), मुंबई. ४०० ०५१.

विषय : म्हाडा संकेत स्थळावर प्रसिध्द यादीमधील माहिती चूक असल्याने दुरुस्ती करणेबाबत

महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन मी आपणास विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो/करते की, मुंबई मंडळामार्फत सन २०१०/२०११ मध्ये गिरणी कामगारांच्या माहिती संकलन मोहिमेमध्ये मी, गिरणी संकेत क्र.__________ गिरणीचे नांव ______________________ या गिरणीमध्ये अर्ज सादर केलेला आहे. परंतू म्हाडा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमध्ये माझ्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे चूक दिसून येते.

१. मी संकेत क्र.____________ गिरणीचे नांव ____________________________ चा कामगार असून माझे नांव संकेत क्र.___________ गिरणीचे नांव ____________________________ या गिरणीच्या यादीमध्ये दिसून येते.

२. माझे नांव __________________________________ असून म्हाडा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमध्ये माझे नांव ________________________________ असे दिसून येते.

माझ्या माहितीमध्ये उपरोक्त चूक झालेली असल्याने सदर चूक दुरुस्ती करण्यात येवून माझी योग्य माहिती यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावे, ही नम्र विनंती.

माझा संपर्कासाठीचा पत्ता वरील प्रमाणे असून मोबाईल क्र.______________________ हा आहे.

आपला विश्वासू

सोबत : दुरुस्तीबाबतचे पुरावे.

सही _________________________

( नांव__________________________)